**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६४/२०१९** **दिनांक ०९/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०८/२०१९ ते ०९/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून १४/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०८ | ०४/०८ | ०५/०८ | ०६/०८ | ०७/०८ | ०८/०८ | ०९/०८ | | १०/०८ | ११/०८ | १२/०८ | १३/०८ | १४/०८ |
| ११७.६ | २८८.६ | १५०.४ | ७४.८ | ६२.२ | ३७.२ | १८.४ | **पाऊस (मिमी)** | ३० | ३१ | २५ | २० | २४ |
| २८.२ | २५.८ | ३१.० | २७.० | २८.४ | २८.० | २८.२ | **कमाल तापमान (अं.से)** | २९ | २९ | २९ | २९ | २९ |
| २३.६ | २३.४ | २४.० | २४.६ | २४.२ | २५.४ | २५.५ | **किमान तापमान (अं.से)** | २७ | २५ | २५ | २५ | २५ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ५ | ५ | ४ | ८ |
| ८५ | ९५ | ८९ | ९७ | ९५ | ९३ | ८७ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९१ | ९२ | ९४ | ९३ | ९४ |
| ९५ | ९५ | ९५ | ९३ | ९२ | ९० | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८७ | ८२ | ८२ | ८१ | ८० |
| ८.२ | ९.२ | ५.३ | ४.८ | ६.८ | ६.३ | ७.७ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | २६ | १७ | १० | १० | ८ |
| ई.पु. | ई | ई | आ. | ई.पु. | ई | ई.पु. | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | नै.द. | नै.प. | प. |
| | | | | | | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | | | | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** | | |
| **७४९.२** | | | | | | **३४०१.८** | | | | **३५५८.३** | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १० ते १४ ऑगस्ट, २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून वाऱ्याचा वेगात १० ते २६ कि.मी. पर्यंत वाढ संभवते.**

**दिनांक ९ ते १५ ऑगस्ट, २०१९ साठी कोकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे व सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरातील पाणी जास्त काळ न साठवता २-३ दिवसांच्या अंतराने जुने पाणी बाहेर काढण्याची आणि नवीन पाणी खाचरात घेण्याची व्यवस्था करावी. पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही  मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून पिकावरून एक जाड दोर आडवा धरून ओढत न्यावा त्यामुळे सुरळ्या पाण्यात पडतील. नंतर एक ते दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूला फोडून लावावे व सर्व सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात व त्यानंतर शेतात नवीन पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था करावी.<br>**टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी तसेच पाऊसामध्ये कीटकनाशकाचे द्रावण पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर द्रावणात मिसळून फवारणी करावी.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा. |
| **नागली (नाचणी)** | **फुटवे अवस्था** | • नागली पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करावी. बेणणी केल्यानंतर नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • १० वर्षावरील "हापूस" जातीच्या आंबा झाडास नियमित व लवकर फळे धरण्यासाठी कलमांच्या वाढीच्या विस्तारानुसार पॅक्लोब्युट्राझोल (कल्टार) हे वाढ निरोधक संजीवक देण्यात यावे. प्रत्येक झाडाचा पूर्व -पश्चिम व दक्षिण - उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून प्रति मीटर व्यासास ०.७५ ग्रॅम पॅक्लोब्युट्राझोल (३ मि.ली. कल्टार) द्यावे. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर प्रती झाड पाण्यात मिसळून १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावेत. पॅक्लोब्युट्राझोल देण्यापूर्वी झाडाभोवती असलेले सर्व तण काढून टाकावे.<br>**टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना पॅक्लोब्युट्राझोल द्यावे. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • काजूच्या ४ वर्षावरील प्रती कलमास  ४० किलो शेणखत/हिरवळीचे खत, २ किलो युरिया, १.५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खते कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा चार वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी पाव पट, दुसऱ्या वर्षी अर्धा पट आणि तिसऱ्या वर्षी पाऊण पट या प्रमाणे देण्यात यावी. **टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत. |

| | | |
|---|---|---|
| **सुपारी** | **वाढीची अवस्था** | • सुपारीच्या ३ वर्षावरील प्रती झाडास १० किलो शेणखत, १२ किलो हिरवळीचे खत, १६० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खते झाडाच्या बुंध्या पासून १ मीटर अंतरावर बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा तीन वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/३ पट आणि दुसऱ्या वर्षी २/३ पट या प्रमाणे देण्यात यावी.<br>• सुपारी तडकण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शिफारस केलेल्या खतांबरोबर ६०० ग्रॅम सूक्ष्म अन्नद्रव्ये (बोरोन ६० ग्रॅम, झिंक ३०० ग्रॅम, मगनीज ६० ग्रॅम, लोह १२० ग्रॅम आणि कॉपर ३० ग्रॅम) पहिल्या हप्त्यात जमिनीतून देण्यात यावी.<br>**<u>टिप:</u>** पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत.<br>• सुपारीवरील कोळेरोगाच्या नियंत्रणासाठी ०.३ टक्के एलिएट (फॉसिटील एल ८० टक्के पाण्यात मिसळणारी पावडर ३ ग्रॅम प्रती १ लिटर पाण्यात) या बुरशीनाशकाचा तिसरा हप्ता मुळावाटे देण्यात यावा. यासाठी सुपारी झाडाची अन्न घेणारी दोन मुळे निवडून त्याची टोके कापून घ्यावीत. वरील प्रमाणे बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून प्रत्येकी १०० मि. ली. या प्रमाणात दोन प्लास्टिक पिशव्यात भरून कापलेली मुळे पिशवीत व्यवस्थित बुडवून पिशव्या मुळाला बांधून घ्याव्यात. किंवा १ टक्का बोर्डोमिश्रणाची किंवा ०.३७५ टक्के कॉपर ऑक्सिक्लोराईड (३७.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात ) तिसरी फवारणी करावी.<br>**<u>टिप:</u>** पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी तसेच पाऊसामध्ये बुरशीनाशकाचे द्रावण पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर द्रावणात मिसळून फवारणी करावी. |
| **नवीन फळबाग** | **वाढीची अवस्था** | • पुढील दोन दिवस वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार दयावा. |
| **भाजीपाला पिके** | **वाढीची अवस्था** | • पुढील दोन दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत.<br>• काकडी, कारली, पडवळ, दिघीभोपला, तांबडा भोपळा, दोडका इ.वेलवर्गीय भाजीपाला पिकांवर तांबडे भुंग्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली. मॅलेथीऑन ५० टक्के प्रवाही २० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>**<u>टिप:</u>** पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी तसेच पाऊसामध्ये कीटकनाशकाचे द्रावण पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर द्रावणात मिसळून फवारणी करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**